
प्रा. श. श्री. पुराणिक

# उत्तरायण



# उत्तरायण

(तात्यासाहेब केळकर १९३२ - १९४७)

प्रा. श. श्री. पुराणिक

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह

स्नेहल ८०

प्रकाशक
सौ.अंजली रविंद्र घाटपांडे
१० शांतिब्रह्म सोसायटी
डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे २९.
फोन : ३३१३३९.

लेझर कंपोज
स्कॅन ग्रॅफिक्स,
पुणे ५. फोन : ५९०५९

मुद्रक
श्री. प्रमोद वि.बापट
स्मिता प्रिंटर्स,
१०९९ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

© प्रा. श.श्री.पुराणिक

मुखपृष्ठ
ग्राफी. पुणे ५.

प्रथमावृत्ती :
संकष्टी चतुर्थी,
२ एप्रिल १९९१

मूल्य : ४५ रुपये.

श्री. यशवंत नरसिंह

तथा

अण्णासाहेब केळकर यांस

# उत्तरायण
## (तात्यासाहेब केळकर १९३२ - १९४७)

भूमिका

प्रा. श.श्री.पुराणिक

उत्तरायण म्हणजे निवृत्तिनंतरचा काळ. केळकरांची निवृत्ती, निवृत्तिनंतरचा त्यांचा कालक्षेप, त्यांच्या संसारातील सुखदु:खे, त्यांची जीवनदृष्टी, धर्म व ईश्वर याबद्दल त्यांची दृष्टी, त्याप्रमाणे केळकर यांनी केसरी संस्था, टिळक आणि समाज यांचे ऋण कसे फेडले या गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात धावता आलेख या पुस्तकात काढलेला आहे आणि शेवटी मृत्यूला तोंड देताना त्यांनी निसर्गाचे ऋण कसे फेडले या प्रसंगाने या पुस्तकाचा समारोप केला आहे.

# विषयानुक्रमणिका


| प्रकरण | विषयानुक्रम |
|---|---|
| १ | केसरीकार |
| २ | निवृत्ति-लेखन व्यवसाय |
| ३ | संसार-सुखदु:ख विवेक |
| ४ | बुद्धिप्रामाण्य-परमार्थ |
| ५ | मृत्युचिंतन - एकाकीपणा |

# संदर्भ - ग्रंथ


१. शतगोष्टी - न.चि.केळकर
२. माझा जन्मभरचा एक उद्योग - श.न. केळकर
३. केळकरांच्या आठवणी - स.वि. बापट
४. स्वभावाला औषध नाही - म.म. केळकर
५. वाळवंटातील पावले - का.न.केळकर
६. केळकरांचा खाजगी पत्रव्यवहार - य.नं. केळकर
७. वाङमयाचा नफा - य.न. केळकर
८. सह्याद्री नोव्हेंबर ४७, ऑक्टोबर ४८
९. म.सा. पत्रिका - केळकर अंक १९७२
१०. स्वभावचित्रे - दिवेकर
११. माझे समकालीन - न.वि.गाडगीळ
१२. विचार शलाका - श्री.म.माटे
१३. चित्रपट - श्री.म.माटे
१४. केसरी ज्युबिली अंक - १९३२
१५. लो.टिळक आठवणी व आख्यायिका - संपादक स.वि.बापट
१६. केळकरांची निबंधमाला - का.न.केळकर
१७. श्रद्धांजली - ग.त्र्यं.माडखोलकर
१८. श्री.कृ.कोल्हटकर - व्यक्तिदर्शन - ग.त्र्यं. माडखोलकर
१९. निबंधसुगंध - ना.सी.फडके
२०. समाधीवरील अश्रु - प्र. के. अत्रे,
२१. राजवाडे चरित्र - का. वि. भट
२२. सह्याद्री दिवाळी अंक १९८७

# प्रस्तावना

नरसिंह चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर हे १९३२ मध्ये केसरीतून निवृत्त झाले आणि १९४७ साली निधन पावले. त्यावेळी त्यांचे वय पंचाहत्तर वर्षांचे होते. केळकरांच्या आयुष्यातील या अखेरच्या पंधरा वर्षांचे, केवळ कल्पनेने नव्हे, तर शक्य तो त्यांच्याच आणि त्यांच्या सुहृदांच्या शब्दांत शब्दचित्र रेखाटण्याचा ह्या पुस्तकात प्रयत्न केला आहे. त्यांच्या उत्तरायुष्याचे हे चित्रण असल्यामुळे 'उत्तरायण' हे नाव या पुस्तकाला दिले आहे. राजकारणी म्हणून किंवा पत्रकार म्हणून किंवा वाङ्मयसेवक म्हणून केळकरांच्या कार्याची चर्चा करणे हा या पुस्तकाचा उद्देश नाही. तर माणूस म्हणून केळकर कसे होते हे दाखवणे एवढाच हेतू या पुस्तकात प्रधान आहे. त्या दृष्टीने पाहता केळकरांचे हे व्यक्तिदर्शनच म्हणवे लागेल. आणि त्यामुळे त्यांच्या सकृत्दर्शनी लहानसहान गोष्टींनाही योग्य ते स्थान देण्यात आले आहे. जॉन्सनने म्हटल्याप्रमाणे, 'There is nothing Sir, too little for so little creature as Man. It is by studying little things that we attain the great art of having as little misery and as much happiness as possible. माणूस इतका लहान आहे की त्याच्या बाबतीत लहान अशी गोष्ट संभवतच नाही. लहान लहान गोष्टींचा अभ्यास करूनच कमीत कमी दुःख आणि जास्तीत जास्त सुख मिळविण्याची मोठी कला माणसाला हस्तगत करता येते.

केळकरांना जाऊन आज जवळजवळ पन्नास वर्षे झाली. इतक्या कालावधीनंतर आज त्यांच्या उत्तरायुष्यांचे अवलोकन करण्याचे प्रयोजन आणि औचित्य काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविकच आहे. या प्रश्नांची उत्तरे अनेक आहेत. केळकर निवृत्त झाले, ते वृद्ध झाले, ते मृत्यू पावले या तीन गोष्टी प्रत्येकाच्या जीवनात घडतात. आणि कोणालाच त्या नको असतात. या तीनही अवस्थांत केळकरांनी आपले वैशिष्ट्य प्रकट केले व ते आजही उपयुक्त आहे, असे माझे मत आहे. माणूस सेवानिवृत्त झाला म्हणजे त्याच्या जीवनात पोकळी निर्माण होते. वार्धक्यात शारीरिक व मानसिक व्याधींबरोबर दोन पिढ्यांचे संघर्ष निर्माण होतात. 'वणवण हिंडे चित्त वृद्धाप्यकाळीं' असे रामदासांनी म्हटले आहे. त्याची प्रचीती येते आणि वार्धक्य हा ययातीला वाटला तसा शाप भासू लागतो.

परंतु असे नेहमी असतेच असे नाही. इंग्रजी वाङ्मयात "The days of our youth are the days of our glory' असे म्हणणारा बायरन हा यौवनाचा कवी आहे. पण ब्राउनिंग आणि टेनिसन हे जीवनाच्या सर्व अवस्थांप्रमाणे वार्धक्याचेही स्वागत करणारे कवी आहेत.

ब्राऊनिंगने Grow old along with me,

The best is yet to be,

The last of life for which the first was made'.

असा अमर आशावाद प्रकट केला आहे. आणि टेनिसनाचा युलिसिस आपल्या समुद्रावरच्या सोबत्यांना म्हणतो की - 'You and I are old, Old age hath yet its honour and its foil.!' इतिहासकारांचा मुकुटमणी असलेल्या गिबनचे तर असे मत होते की उत्तरकाल हाच जीवनातला सगळ्यात समाधानाचा काळ होय. कारण त्या वेळी आपल्या वासना शमलेल्या असतात, आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण झालेल्या असतात, आपली कर्तव्ये पुरी झालेली असतात. आपली प्रतिष्ठा आणि आर्थिक स्थिती स्थिरपद झालेली असते. Our passions are supposed to be calmed, our duties fulfilled, our ambition satisfied, our fame and fortune established on a solid basis.प्रसिद्ध फ्रेंच चरित्रकार व विचारवंत आंद्रे मॉर्क याने आपल्या 'Art of Living' या ग्रंथात The art of growing old म्हणून एक स्वतंत्र प्रकरणच लिहिलेले आहे. इंग्रजी साहित्यातल्या ब्राऊनिंगप्रमाणे संस्कृत वाङ्मयातला भवभूति हा सुद्धा प्रौढ वयाचा कवी आहे. उत्तराम चरितातला त्याचा प्रसिद्ध श्लोक

'अद्वैत सुखदु:खयोरनुरतां सर्वास्ववस्थासु यत्।

विश्रामोहृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्या रस:।

कालेनावरणात्ययात्परिणते यत्स्नेहसारे स्थित ।

भद्र तस्य सुमानुष्यस्य कथम प्येकं हि हितत्प्रार्थ्यते ।.

(ज्या भाग्यवंताचे तेवढेच भाग्य सांगण्यासारखे आहे की ज्यात सर्व अवस्थांत सुखदु:खांचे अद्वैत साध्य झालेले असते. हृदयाची जी विश्रांती आहे, ज्यातील समाधान वार्धक्यानेही कमी होत नाही, काळाच्या ओघात सर्व आवरणे गळून पडून जे केवळ निर्भेळ स्नेहाच्या रूपाने अवशेष आहे.) गिब्जने जीवनातल्या संध्याकाळच्या या प्रसन्नतेला 'Autumnal Felicity' शारदीय प्रसन्नता असे म्हटलेले आहे.

हे 'शरदाचे चांदणे' केळकरांच्या उत्तरजीवनात पडलेले आहे, असे मला वाटते. ही प्रसन्नता स्वभावसिद्ध नसून प्रयत्नसाध्य होती, हे विशेष. केळकरांच्या प्रदीर्घ जीवनात त्यांनी अनेक चढ-उतार पाहिले. टीका, निंदा सहन केल्या, संसारातील सुखदु:खांचे अनुभव घेतले, अशा वेळी केळकरांनी सुखदु:ख विवेक कसा केला आणि कशानेही न ढळणारी अखंड प्रसन्नता कशी साध्य करून घेतली हा विषय मला वाटते, चिरंतन महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने ह्या पुस्तकाची उपयुक्तता सार्वकालिक म्हणावी लागेल.

एवढेच नव्हे तर केळकर हे विद्याभीरुचीचे आणि विद्याव्यासंगाचे दुसरे नाव होते त्यांनी एकेचाळीस वर्षे केसरीत सेवा केली. पण तेथून ते स्वच्छेने निवृत्त झाले. जवळजवळ चाळीस-पन्नास संस्थांत ते होते पण कोठे ही वतनदार बनून राहिले नाहीत. त्यांनी स्वतःहून सर्व संस्थांचे त्यागपत्र दिले. ज्याला आपण सामाजिक बांधिलकी म्हणतो त्या 'ऋणकल्पनेने' त्यांचे संबंध जीवन शुचिर्भूत झाले होते. गांधी व टिळक या दिग्गजांशी सुद्धा आपल्या बुद्धीशी प्रामाणिक राहून मतभेद व्यक्त करण्याइतके नैतिक धैर्य त्यांच्यापाशी होते. त्यांनी सर्वांबद्दल आदर ठेवला पण कोणाच्याही आहारी जाऊन विभूतीपूजेचे बंड माजविले नाही. या सर्व गोष्टीचे मूल्य आजच्या काळाच्या संदर्भात किती मोठे आहे, हे सांगितले पाहिजे असे नाही.

केळकरांचा विद्याव्यासंग आणि सुसंस्कृतता कशी होती, हे आजही त्यांचे चिरंजीव य. न. केळकर यांच्याकडे पाहिले तर कळते. आज त्यांचे वय ८६ वर्षांचे आहे, पण त्यांच्या व्यासंगाला खळ नाही. आयुष्याची पाच तपे त्यांनी इतिहासाच्या सेवेला वाहिली आहेत. 'ऐतिहासिक पोवाडे' व 'वसईची मोहीम' ही त्यांची पुस्तके, त्या विषयावरचे शेवटचे शब्द म्हणता येतील अशा तोडीची आहेत. 'रियासतींचा कळसाध्याय', 'गजगौरव', 'भगवाझेंडा व जरी पटका' 'छत्रपती व पेशवे यांचे अनौरस वंशज' इत्यादी त्यांचे लेख 'भूतावर भ्रमण' व 'इतिहासातील सहली या दोन पुस्तकांत प्रसिद्ध झाले आहेत. ते वाचले म्हणजे कणाकणाने माहिती गोळा करून त्यांनी ती किती रसाळ आणि विदग्ध शैलीने मांडली आहे याची चांगली प्रचीती येते. 'इतिहासातील सहली'चे दोन भाग आहेत. असे आणखी तीन भाग होतील एवढे साहित्य त्यांच्यापाशी प्रकाशकाची प्रतीक्षा करीत पडले आहे. ते प्रसिद्ध झाले तर केळकरांचा काय फायदा होईल हा प्रश्न निराळा. पण ते प्रसिद्ध झाले नाही तर मराठी इतिहासाचे व सारस्वताचे मात्र मोठे नुकसान होईल असे मला वाटते.

असो. या योगायोगाच्या गोष्टी. आज तरी त्यांचा माझा गेली पंधरा वर्षे जो ऋणानुबंध आला त्याची आठवण म्हणून त्यांच्या वंदनीय तीर्थरूपांचे हे चरित्र त्यांना अर्पण करण्याची संधी घेण्यात मला मोठा आनंद वाटत आहे.

प्रस्तावनेच्या शेवटी काम राहिले ते आभार मानण्याचे. केळकरांना जाऊन इतकी वर्षे झाली त्यांच्या काळी ते लोकांच्या नजरेसमोर असले तरी Public memory is short, या न्यायाने ते आता विस्मृतीत गेल्यासारखेच होते. त्यातही त्यांच्या पूर्वायुष्याच्या मानाने त्यांच्या उत्तरायुष्यात लौकीक दृष्टीने तरी चित्तवेधक व बोधप्रद फारसे काही राहिले नव्हते. पण माझ्या दृष्टीने प्रसिद्धीच्या

झोतापासून सर्वस्वी दूर असलेला तोच कालखंड केळकरांच्या आयुष्यात सर्वसामान्यांना बोधप्रद व मार्गदर्शक होण्यासारखा होता. कारण माणसाचा मोठेपणा, खरोखर तो खुर्ची सोडतो, तेव्हाच प्रतीत होतो. सुदैवाने माझा हा दृष्टीकोन 'स्नेहल प्रकाशन' चे प्रकाशक श्री.रवि घाटपांडे यांना पटला. त्यांनी व त्यांचे स्नेही प्रा.प्र.के.घाणेकर यांनी मोठ्या आस्थेने या पुस्तकाचे प्रकाशनपूर्व परीक्षण केले व अखेर ते प्रकाशित केले याबद्दल या दोघांचाही मी फार आभारी आहे. किंबहुना प्रकाशन हे निमित्त आहे. या निमित्ताने श्री.घाटपांडे व प्रा.घाणेकर यांच्या स्नेहाचा व मैत्रीचा जो लाभ झाला तीच माझी कायमची कमाई आहे, असे मी समजतो.

# उत्तरायण

श.श्री. पुराणिक

''सत्संगतीचा लाभ केव्हा ही श्रेयस्कर व फलप्रदच होतो. मला केसरी-मराठा संस्थेला येऊन मिळण्याची संधी देण्याची इच्छा लो.टिळकांना व्हावी, ती संधी घेण्याची इच्छा मला व्हावी आणि या संस्थेत छत्तीस वर्षांहून अधिक काळपर्यंत मी स्थिरपद होऊन तिची सेवा करता यावी हा सर्वस्वी सुदैव योग होय. आज छत्तीस वर्षे माझी लोकयात्रा नीट चालली. माझ्या आवडीचा व्यवसाय सतत भरपूर माझ्या हातून घडला. लौकिकदृष्ट्या यश किंवा कीर्ती ज्याला म्हणतात त्याचा थोडाबहुत लाभ मला झाला आणि समाजोपयोगी असे कार्य माझ्या हातून झाले हे सर्व लो.टिळकांचा व त्यांचा संस्थेचा संबंध मला दैवयोगाने जडवून दिल्यामुळेच झाले.''

२४ ऑगस्ट १९३२ रोजी पुण्याच्या केळकर वाढदिवस मंडळाने केळकरांचा एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त टिळक स्मारक मंदिरात सत्कार केला त्यावेळी आभाराचे भाषण करताना केळकरांनी काढलेले हे उद्‌गार होते.

निरर्थक बोलण्याची किंवा लिहिण्याची सवय केळकरांना पहिल्यापासूनच नव्हती. त्यांचे चिरंजीव बापूराव केळकर यांनी स्वतः कायद्याचा अभ्यास केला आणि त्यावेळी केळकरांच्या लिहिण्यातले कायद्याच्या परिभाषेतले हे वैशिष्ट्य त्यांच्या लक्षात ठळकपणे भरले की, त्याच त्याच शब्दांचा पुनरुच्चार किंवा पुनरावृत्ती किंवा निरर्थक शब्द या लेखन दोषांचा आढळ केळकरांच्या लिहिण्यात शपथेला सुद्धा होत नव्हता. त्यामुळे केळकरांच्या आभारातल्या भाषणातले हे शब्द सामान्य आभाराच्या भाषणातले शब्द असतात त्याप्रमाणे गोड पण निरर्थक गूढगुंजन नव्हते; ते सार्थ साभिप्राय होते. १८९६ च्या मार्च महिन्यात टिळक मिरजेकडे प्रवास करीत असताना सातारारोड स्टेशनवर साताराचे वकील गोविंदराव रानडे हे त्यांच्या डब्यात चढून बसले. रानडे व टिळक यांची पूर्वीची ओळख होती. वेळ रात्रीची. दोघांची ही झोपमोड झालेली त्यामुळे दोघेही काही वेळ गप्पा गोष्टी करीत बसले. बोलण्याच्या ओघात सहज टिळक म्हणाले, 'तुमच्या वकिलीच्या धंद्यात पुष्कळ

## उत्तरायण .....

तात्यासाहेब केळकरांना जाऊन आज पन्नास वर्षे होत आली. पण ज्यांच्यावर काळाचा परिणाम होत नाही असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे असे जाणवल्याशिवाय रहात नाही. सेवानिवृत्तीनंतर अटळपणे येणारे वार्धक्य आणि मृत्यू या समस्या त्यांच्यासमोर ही होत्या. आणि जीवनात जाणवणारी पोकळीहि त्यांच्यासमोर होती. सामान्य काय किंवा असामान्य काय माणसाच्या पुढे अपरिहार्यपणे येणाऱ्या या चिरंतन समस्यांना तात्यासाहेबांनी आपल्या विद्याव्यासंगाच्या आणि विवेकबुद्धीच्या जोरावर कशा प्रकारे तोंड दिले आणि जवळजवळ चौसष्ट संस्थांचे त्यागपत्र देण्यात त्यांनी आपली अनासक्त वृत्ति कशी प्रकट केली, याचा धावता आलेख आजच नव्हे तर नेहमीच बोधप्रद ठरण्यासारखा आहे.

- प्रकाशक -

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह